नि.फौ.ख.क्र.१/२०२३
सरकार–वि–विनोद व इतर
CNR No.MHCH150000022023

**निशाणी क्रमांक २६ वरील आदेश**
(दि.१६/०८/२०२३ रोजी पारीत)

१. अर्ज, त्यावरील सरकारी वकिल, आरोपी व तपास अधिकारी यांचे नि.क्र.३१ वरील म्हणणे वाचले व प्रकरणाचे अवलोकन केले. उभयपक्षांचा युक्तीवाद ऐकुन घेतला.

२. अर्जदाराचे असे म्हणणे आहे की, तो खटल्यातील जप्त ईन्व्हरटर व बॅटरीचा मालक आहे. पोलीसांनी सदर ईन्व्हरटर व बॅटरी आरोपीकडुन तपासादरम्यान जप्त केली आहे. सदर जप्त ईन्व्हरटर व बॅटरी अर्जदारास दैनंदीन कामाकरीता आवश्यक आहे. सदर जप्त ईन्व्हरटर व बॅटरी पोलीस ठाणे, सिंदेवाही येथे पडुन आहे. अर्जदार हा न्यायालयाने घातलेल्या अटी व शर्तीचे पालन करण्यास तयार आहे. शेवटी, त्याने अर्ज मंजुर करण्याची विनंती केली. याउलट विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांच्या मते, सदर ईन्व्हरटर व बॅटरी पुराव्याच्या दृष्टीने महत्वाचा भाग आहे. त्यामुळे त्याचे पुराव्याचे महत्व लक्षात घेता त्यांनी अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली. याउलट तपास अधिकारी व आरोपींनी अर्ज मंजुर करण्यास कोणतीही हरकत घेतली नाही.

३. अर्ज व त्यासोबत दाखल केलेले कागदपत्रांवरुन असे दिसुन येते की, तपास अधिकारी यांनी गुन्हा क्र.२८०/२०२२, कलम ४६१, ३८०, ४११, भा.दं.वी. मध्ये एक ल्युमिनस कंपनीचे ईन्व्हरटर आय.एस.आय.टी.१२०४२ व सोलार बॅटरी एन.एक्स.जी./७५० वाय.पी.एस. जप्त केली आहे. अर्जदाराने तो जप्त ईन्व्हरटर व बॅटरीचा मालक असल्याचे कथन केले आहे. अर्जदाराने नि.क्र.२९ प्रमाणे दस्तऐवजाची यादी दाखल करुन सदर प्रकरण त्याला चालविण्याचे अधिकार असल्याबाबत ग्रा.पं.नवरगाव यांचा ठराव, ईन्व्हरटर व बॅटरी विकत घेतल्याबाबतची पावती व अर्जदाराच्या आधार कार्डची प्रमाणीत प्रत दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल

केलेल्या कागदपत्रावरुन असे दिसुन येते की, जप्त ईन्व्हरटर व बॅटरी ही ग्रा.पं.नवरगाव यांच्या मालकीची आहे. ग्रा.पं.नवरगाव यांनी सदर मुद्देमाल सुपुर्तनाम्यावर सोडविण्याकरीता अर्जदारास ठराव पारीत करुन अधिकार दिला आहे. त्याचप्रमाणे प्रकरणातील जप्त ईन्व्हरटर व बॅटरी तपासकामी आवश्यक राहिलेली नाही. तसेच पोलीस ठाणे, सिंदेवाही यांचेकडे ईन्व्हरटर व बॅटरीच्या देखभालीची व्यवस्था नाही. त्यामुळे सदर ईन्व्हरटर व बॅटरी पोलीस ठाणे, सिंदेवाही यांचेकडे पडुन राहील्यास खराब होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याउलट अर्जदार हा जप्त ईन्व्हरटर व बॅटरीचा मालक असल्याने तो सदर वस्तु सुरळीत ठेवु शकतो. त्यामुळे जप्त ईन्व्हरटर व बॅटरी पोलीस ठाणे, सिंदेवाही येथे ठेवणे न्यायोचीत होणार नाही. म्हणुन, माननीय सर्वोच्च न्यायालयाचे सुंदरभाई–वि–गुजरात सरकार या न्यायनिर्णयानुसार अर्जदार हा जप्त ईन्व्हरटर व बॅटरीचा तात्पुरता ताबा मिळण्यास पात्र ठरतो. त्याचप्रमाणे अर्जदाराकडुन योग्य ते बंधपत्र घेतल्यास अभियोग पक्षाचे हिताचे रक्षण करता येवु शकते. त्यामुळे सदरचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. सबब, मी खालील आदेश पारीत करतो.

## आदेश

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. जप्त ईन्व्हरटर व बॅटरी अर्जदाराने एकुण रु.३०,०००/–(अक्षरी रुपये तीस हजार फक्त) चे बंधपत्र लिहुन व त्याची योग्य ओळख व खात्री पटवुन खालील अटीवर त्याचे सुपुर्द करावे.

३. अर्जदाराने जप्त ईन्व्हरटर व बॅटरीची कोणत्याही प्रकारे विल्हेवाट लावु नये किंवा त्यामध्ये बदल करु नये.

४. अर्जदाराने जप्त ईन्व्हरटर व बॅटरी न्यायालय सांगेल तेव्हा व तेथे हजर करावे.

५. तपासी अंमलदाराने जप्त ईन्व्हरटर व बॅटरीचे अर्जदाराचे खर्चाने सर्व बाजुने रंगीत फोटो काढुन व विस्तृत पंचनामा तयार करुन अर्जदाराचे सुपुर्द करावे.

तसेच पंचनाम्याची एक प्रत न्यायालयात दाखल करावी.

Digitally signed by SHAHAJI DATTARAO BHOSALE
Date: 2023.08.16 17:25:30 +0530

**(शहाजी द. भोसले)**

दि.१६/०८/२०२३ न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी, सिंदेवाही

मी, प्रसाद सुरेशराव पोहनकर, लघुलेखक (दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) तथा न्यायदंडाधिकारी, (प्र.श्रे.), सिंदेवाही) याची पुष्टी करतो की, या पी.डी.एफ. ची सामग्री ही मुळ न्यायनिर्णयाच्या शब्दाप्रमाणेच शब्द आहे.